Marathi Note 1

# मुंबई विद्यापीठ

## निवडणूक विभाग

क. नि.वि./आयसीडी/३४८/२०१५.

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांचे/स्वायत्त महाविद्यालयांचे/संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठीय संस्था आणि मान्यताप्राप्त संस्था यांचे विभाग प्रमुख/संचालक, शिक्षण संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने आणि त्यांना उच्च शिक्षणाच्या व संशोधनाच्या दर्जात सुधारणा करणे **शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र शासनाला, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ निरसित करणे आणि राज्यातील सर्व कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांसाठी एक सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करणे** इष्ट आहे.

या संदर्भात महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, वर्ष १ अंक ३१ (५), दिनांक १७ ऑगस्ट २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क.-२९ नुसार सर्व संबधितांना कळविण्यात येते कि, सन २०१५ **मध्ये घेण्यात येणा-या विद्यापीठातील विविध प्राधिकरणाच्या व अभ्यास मंडळाच्या सदस्यांच्या निवडणुकांची सुरू करण्यात आलेली नावनोंदणी प्रक्रिया (ऑनलाइन/ऑफलाइन) वरिल अधिनियमानुसार** तात्काळ थांबविण्यात येत असून **दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६** पर्यत कोणत्याही निवडणूका घेण्यात येणार नाहीत. याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**सन २०१५ चा महाराष्ट्र** अधिनियम क.-२९ सोबत जोडत आहोत. तसेच सदर अधिनियम विद्यापीठाच्या <u>www.mu.ac.in/election</u> या संकेत स्थळी उपलब्ध आहे.

(सही) २६/८/१५<br>
(डॉ. एम. ए. खान)<br>
कुलसचिव

मुंबई - ४०० ३२.<br>
दिनांक - ऑगस्ट,२०१५.

प्रति,

मुंबई विद्यापीठाच्या विभागांचे विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव, प्राध्यापक-नि-संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र आणि समन्वयक, ठाणे उपकेंद्र.

---------------

क.नि.वि./ ३४८/२०१५. मुंबई - ४०० ०३२. दिनांक - २६ ऑगस्ट, २०१५.

प्रत माहितीकरिता रवाना :-

१) परीक्षा नियंत्रक,<br>
२) नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री<br>
३) समन्वयक, विद्यापीठ संगणक केंद्र,<br>
४) उपकुलसचिव, (सा.प्र.वि) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन विद्यानगरी,<br>
५) उपकुलसचिव, (वित्त व लेखा) परिक्षाभवन, विद्यानगरी,<br>
६) उपकुलसचिव (वित्त व लेखा) फोर्ट,<br>
७) सहायक कुलसचिव, (सा.प्र.वि) फोर्ट,<br>
८) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र रत्नागिरी,<br>
९) सुरक्षा अधिकारी, फोर्ट व विद्यानगरी परिसर,<br>
१०) स्वीय सहाय्यक १) कुलगुरू,२) प्र-कुलगुरू,३) कुलसचिव,४)संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ.

(सही) २६/८/१५<br>
(डॉ. एम. ए. खान)<br>
कुलसचिव

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३१(५)] सोमवार, ऑगस्ट १७, २०१५/श्रावण २६, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ४९

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.**—महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम . . | पृष्ठे १-२ |

दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“ महाराष्ट्र शासन राजपत्रात ”** दिनांक १७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९९४ चा महा. ३५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये इतर गोष्टींबरोबरच, विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांची निवडून दिलेल्या सदस्यांचा समावेश असलेली निरनिराळी प्राधिकरणे व मंडळे स्थापन करण्यासाठी तरतूद आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने आणि त्याना उच्च शिक्षणाच्या व संशोधनाच्या दर्जात सुधारणा करणे शक्य व्हावे म्हणून महाराष्ट्र शासनाला,
१९९४ चा महा. ३५. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ निरसित करणे आणि राज्यातील सर्व कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांसाठी एक सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे, असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** असे अपेक्षित आहे की, याबाबतीत नवीन अधिनियम अधिनियमित करण्यासाठीचे विधेयक नजीकच्या भविष्यकाळात राज्य विधानमंडळात मांडले जाईल ;

**आणि ज्याअर्थी,** नवीन अधिनियमाच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची निरनिराळी प्राधिकरणे व मंडळे स्थापन करण्याची आवश्यकता राहणार आहे ;

**आणि ज्याअर्थी,** काही विद्यापीठांच्या प्राधिकरणाच्या व मंडळांच्या सदस्यांचा पदावधी हा, ३१ ऑगस्ट २०१५ रोजी समाप्त होणार आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अशा प्रत्येक विद्यापीठाची प्राधिकरणे व मंडळे यामधील निवडून आलेल्या सदस्यांची रिक्त पदे भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** वर नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी अशा विद्यापीठांची प्राधिकरणे व मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे.

**२.** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " विद्यापीठ अधिनियम " असा करण्यात आला आहे) किंवा त्याखाली केलेले कोणतेही परिनियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यापीठ अधिनियमाच्या अनुसूचीत उल्लेख केलेल्या कोणत्याही विद्यापीठात, त्या विद्यापीठाचे कोणतेही प्राधिकरण किंवा कोणतेही मंडळ याच्या कोणत्याही निवडून आलेल्या सदस्यांचे रिक्त पद-मग ते कोणत्याही रीतीने रिक्त झालेले असो-भरण्यासाठी ३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा करण्यात आला आहे) कोणत्याही निवडणुका घेण्यात येणार नाहीत.

१९९४ चा महा. ३५.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याचे परिणाम.

**३.** विद्यापीठ अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही परिनियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा कोणत्याही इतर मंडळाने, उक्त कालावधीत केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, अशा कोणत्याही प्राधिकरणात किंवा मंडळात निर्माण झालेली जी रिक्त पदे निवडणुकीद्वारे भरणे आवश्यक होते ती पदे तशी भरण्यात आली नाहीत केवळ याच कारणावरून अवैध ठरणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.